पूर्णा कारखान्यात बायोगॅस प्रकल्पास मंजुरी

आमदार नवघरे व समर्थकांकडून वाद निर्माण करण्याच्या प्रयत्नांना मोडता

लोकसत्ता वार्ताहर

वसमत तालुक्यातील पूर्णा कारखान्याच्या सर्वसाधारण सभेत व्यासपीठावर कारखान्याचे अध्यक्ष तथा माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांच्याशी वाद घालताना आमदार राजू नवघरे.

हिंगोली : पूर्णा साखर कारखान्याच्या सर्वसाधारण सभेत सीबीजी प्रकल्प करण्यास बहुमताने मंजुरी देण्यात आली. हा प्रकल्प करण्यापूर्वी आमदार नवघरे यांच्या समर्थकांनी विरोध करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, साखर आयुक्तांनी दिलेले पत्र आणि साखरेबरोबर अन्य प्रकल्पांतून उभे राहणारे अर्थकारण लक्षात घेता हा प्रस्ताव मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली. साखर कारखान्यांनी कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी) तयार करण्यास प्राधान्य द्यावे, असा सल्ला नुकताच साखर आयुक्त यांनी पत्रातून दिला आहे. या नव्या प्रकल्पास राजू नवघरे यांच्या समर्थकांनी विरोध केला होता.

पूर्णा कारखान्याने 'सीबीजी' प्रकल्प उभारण्याची गरज असल्याने तसा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मांडण्यात आला. भविष्यात केवळ साखरेच्या आधारे कारखान्याचे अर्थकारण सुधारणार नाही. त्यामुळे हा प्रकल्प हाती घेण्याची सूचना जयप्रकाश दांडेगावकर यांनी केली होती. त्यास बहुसंख्य सदस्यांनी हात उंचावून मान्यता दिली.

मात्र, आमदार नवघरे यांच्या समर्थकांनी या निर्णयास विरोध करण्याचा प्रयत्न केला. आमदार नवघरे व त्यांचे काही समर्थक या निर्णयावर आम्हाला बोलायचे आहे, असे म्हणत होते.

आमदार नवघरे समर्थक सदस्यांनी गोंधळ घालण्याचा प्रयत्न केला, तेव्हा विषयाला धरून बोला अशी सूचनाही त्यांनी केली होती. मात्र, गोंधळ वाढत असल्याचे दिसताच ' सीबीजी' प्रकल्पास मान्यता देत असल्याचे दांडेगावकर म्हणाले.

साखर आयुक्तांच्या सूचना काय सांगतात?

साखर कारखान्यात 'सीबीजी' प्रकरणात नेमलेल्या समितीने दिलेल्या अहवालानंतर साखर आयुक्त डॉ. कुणाल खेमनार यांनी पाठविलेल्या पत्रात साखर कारखान्यातील 'प्रेसमड', 'स्पेंटवॉश', 'शेतीतील पालापाचोळा' याच्या मिश्रणातून बायोगॅस बनविता येतो. विशेषतः ५५ ते ६० टक्के मिथेन व ३० ते ३५ टक्के कार्बनडाय ऑक्साईड, नायट्रोजन व अमोनिया हायड्रोजन सल्फाईड असे वायू मिळतात. मिथेन हा ज्वलनशील वायू असून, तो स्वच्छ व हरित इंधन म्हणून विकला जाऊ शकतो. शुद्ध वायुविक्रीतून साखर कारखान्यास लाभ मिळवता येईल, अशा मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या होत्या. त्याआधारे नवा प्रकल्प हाती घेतल्याचे पूर्णा साखर कारखान्याच्या प्रशासनातर्फे जाहीर करण्यात आले.

'लाडकी बहीण' योजनेत परभणीमध्ये साडेचार लाखांची नोंदणी

पालकमंत्री संजय बनसोडे यांचा दावा

लोकसत्ता वार्ताहर

परभणी : महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासनाने सुरू केलेल्या 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेत जिल्ह्यात चार लाख ५५ हजार महिलांनी नावनोंदणी केली असून यापैकी तीन लाख ५४ हजार पात्र लाडक्या बहिणींच्या बँक खात्यावर रक्कम जमा करण्यात आली. उर्वरित महिलांना निधी वितरीत करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले. शहरातील राजगोपालचारी उद्यान येथे आज मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या ७६ व्या वर्धापन दिनाचा मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम त्यांच्या हस्ते पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

मराठवाडा मुक्तिसंग्रामच्या आंदोलनात अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. अखेर निजामाच्या जोखडातून मराठवाडा मुक्त होऊन भारतीय संघ राज्यात विलीन झाला. मराठी भाषा, संस्कृती, धार्मिक स्वातंत्र्य, सामाजिक व राजकीय हक्क प्राप्तीसाठी या भागातील जनतेचा त्याग सुवर्ण अक्षरांनी लिहावा असाच आहे, असे पालकमंत्री बनसोडे म्हणाले. या वेळी त्यांनी विविध योजनांतून होणाऱ्या लाभार्थी योजनांची माहिती उपस्थितांना दिली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थ्यांच्या कुटुंबाला वार्षिक तीन गॅस सिलिंडर मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहेत. जिल्ह्यात या योजनेंतर्गत एक लाख ३७ हजार ४६३ पात्र लाभार्थी आहेत. यापैकी ८० हजार ३३० लाभार्थ्यांनी गॅस सिलिंडरचे पुनर्भरण करून घेतले असल्याचेही त्यांनी सांगितले.

स्वातंत्र्यसैनिक व कुटुंबीयांची उपस्थिती

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या या कार्यक्रमात स्वातंत्र्य सैनिक लक्ष्मण बळीराम मकरंद, काशिबाई नानासाहेब कुलकर्णी, शशिकलाबाई दौलतराव मोरे, गंगाबाई वामनराव गिरवलकर, झाकेरा बेगम सय्यद आझम, शिवाजी शंकरराव डावरे, सरोजनी धर्माधिकारी यांच्यासह वीरपत्नी, वीर माता, वीरपिता उपस्थित होते.

किरकोळ वादातून पोलीस कर्मचाऱ्याकडून पत्नीचा खून

लोकसत्ता वार्ताहर

नांदेड : एकीकडे गणेशोत्सवाची धामधूम सुरु होती. गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस कर्तव्यावर होते. याच दरम्यान एका पोलीस कर्मचाऱ्याने आपल्या बंदुकीमधून गोळी झाडून पत्नीचा खून केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (दि.१७) सायंकाळी सहाच्या सुमारास धनेगाव परिसरातील 'आयडियल' सोसायटीत घडली. पत्नीचा खून केल्यानंतर पोलीस कर्मचारी स्वतः पोलीस ठाण्यात हजर होऊन पोलिसांना माहिती दिली. अफजल पठाण असे या कर्मचाऱ्याचे नाव आहे.

अफजल पठाण हा आपल्या कुटुंबीयांसोबत धनेगाव परिसरातील आयडियल सोसायटी येथे राहातो. विमानतळ पोलीस ठाण्यात हवालदारपदी तो कार्यरत आहे. पत्नी नाजीम बेगमसोबत त्याचे नेहमी छोट्या छोट्या कारणावरून वाद होत असायचे. अफजल पठाण मंगळवारी सायंकाळी नोकरीवरुन घरी गेला. यावेळी दोघांमध्ये वाद झाला. हा वाद एवढा टोकाला गेला की, पोलीस कर्मचाऱ्याने स्वतःजवळील बंदुकीमधून पत्नीवर गोळी झाडली. या घटनेनंतर नाजीम बेगमचा जागीच मृत्यू झाला.

गोळीच्या आवाजाने परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. दरम्यान पत्नीवर गोळी झाडल्यानंतर आरोपी अफजल पठाण हा ग्रामीण पोलीस ठाण्यात हजर झाला आणि पोलिसांना घटनेची माहिती दिली. यावेळी ठाण्यातील पोलिसांना देखील धक्काच बसला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. आरोपी अफजल पठाण हा मद्यधुंद अवस्थेत होता, अशी देखील माहिती आहे. त्यांना दोन मुलं असून दोघेही शिक्षणासाठी बाहेरगावी आहेत.

अंतरवाली सराटीत ओबीसींचेही उपोषण

जालना : मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या अंतरवाली सराटी येथील उपोषणाचा बुधवारी दुसरा दिवस होता. दरम्यान, ॲड. मंगेश ससाणे यांच्यासह सहा ओबीसी आंदोलकांनीही अंतरवाली सराटी येथेच आपल्या मागण्यांसाठी बुधवारपासून उपोषण सुरू केले आहे.

यावेळी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना जरांगे म्हणाले, एक वर्ष होऊन गेले तरी मागण्या मान्य केल्या जात नाहीत. तातडीने दोन-तीन दिवसांत आमच्या मागण्यांची अंमलबजावणी सरकारने केली पाहिजे. आपण राजकीय भाषा बोलत नाही, परंतु सरकारने मला त्या वळणावर जाण्याची वेळ देऊ नये. नाही तर मराठा समाजाच्या कल्याणाच्या आड येण्यास देवेंद्र फडणवीस जबाबदार असतील. मागण्यांच्या प्रक्रिया सुरू असल्याचे नाटक करून इतरांना किती दिवस मूर्ख बनविणार आहात ? फडणवीसांनी कितीही राजकीय गणिते मांडली तरी ते अयशस्वी ठरतील. सरपंचांच्या हातात काही नाही तर राज्याचा कारभार उपसरपंच देवेंद्र फडणवीस पाहत असतात, असेही जरांगे म्हणाले.

दरम्यान, बुधवारपासून अंतरवाली सराटी गावातीलच सोनियानगर भागात ॲड. मनोज ससाणे यांच्यासह सहा ओबीसी आंदोलकांनी आपल्या मागण्यांसाठी उपोषण सुरू केले. सगे-सोयरे संदर्भातील अधिसूचना रद्द करावी, कुणबी प्रमाणपत्रांच्या आधारे ओबीसीमध्ये होणारी घुसखोरी थांबवावी, इत्यादी मागण्या या आंदोलकांनी केल्या आहेत. जरांगे यांच्या उपोषणाच्या दबावाला सरकार बळी पडत असून जरांगे हे राजकीय एजंट आहेत. त्यामुळे आपण उपोषणास बसलो असल्याचे ॲड. ससाणे यांनी सांगितले.

लाक्षणिक ताबा सूचना

ICICI Home Finance

नोंदणीकृत कार्यालय : आयसीआयसीआय बँक टॉवर्स, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
कॉर्पोरेट कार्यालय : आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी-कुर्ला रोड, जे. बी. नगर, अंधेरी (पूर्व), मुंबई-४० ०५९.
शाखा कार्यालय : दुसरा मजला, सोनावणे कॉम्प्लेक्स, कामदार पेट्रोल पम्पच्या बाजूला, मिनी मार्केट, मेन रोड, लातूर-४१३ ५१२.

ज्याअर्थी

आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी दी सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ नुसार आणि दी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या नियम ३ सोबत वाचावयाच्या कलम १३(१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजालणी करताना निम्नोल्लेखित कर्जदारांना डिमाण्ड नोटिसा जारी करून उक्त नोटीस मिळावयाच्या तारखेपासून ६० दिवसांत सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्यास फर्माविले.

कर्जदाराने रकमेची परतफेड न केल्यामुळे कर्जदाराला आणि सामान्यतः जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, उक्त नियमांच्या नियम ८ सोबत वाचावयाच्या उक्त अधिनियमाच्या कलम १३(४) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करून निम्नस्वाक्षरीकारांनी येथील निम्नवर्णित मालमत्तेचा ताबा निम्नोल्लेखित तारखांना घेतला आहे. विशेषतः कर्जदाराला व सामान्यतः जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की, या मालमत्तेचा खरेदी-विक्री व्यवहार करू नये आणि मालमत्तेचा कोणताही खरेदी-विक्री व्यवहार आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेडच्या भारासापेक्ष राहील.

अ. क्र.	कर्जदाराचे/ सह-कर्जदाराचे नाव कर्ज खाते क्रमांक	मालमत्तेचे वर्णन/ लाक्षणिक ताबा घेण्याची तारीख	डिमाण्ड नोटीसची तारीख/ डिमाण्ड नोटीसमधील रक्कम (रु.)	शाखेचे नाव
१	तोश्नीवाल महेश व्ही (कर्जदार), अर्चना महेश तोश्नीवाल (सह-कर्जदार), एलएचएलएटी०००१५४४१४२	भूखंड क्र. ४५ आणि ६चा दक्षिण भाग, क्षेत्रफळ १५७ चौ.मी., दक्षिण भाग भूमापन क्र. २९३/बी१ बँक कॉलनी रोड, मौजे निलंगा, ता. निलंगा, जिल्हा लातूर, लातूर, ता. लातूर, महाराष्ट्र-४१३ ५१२ (संदर्भ एलएएन नं. एलएचएलएटी०००१५४४१४२) सीमाबद्धता: उत्तरेला- भूखंड क्र. ६ आणि ४५ पार्ट, दक्षिणेला- श्री. दीपक धूत यांची मालमत्ता, पूर्वेला- ३० फूट रोड, पश्चिमेला- दपकाकडे जाणारा रस्ता. ताबा घेण्याची तारीख : **१३ सप्टेंबर २०२४**	१२.०६.२०२४ रु. ५००६१६६.२	लातूर-बी

उपरोल्लेखित कर्जदारांना/ हमीदारांना याद्वारे रकमेची परतफेड करण्यासाठी ३० दिवसांची नोटीस देण्यात येते. अन्यथा सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स २००२च्या नियम ८ आणि ९ अंतर्गत उपबंधांनुसार या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ३० दिवस संपल्यानंतर गहाण मालमत्ता विकल्या जातील.

दिनांक : १९.०९.२०२४ । स्थळ : लातूर **प्राधिकृत अधिकारी, आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड**

ICICI Home Finance

कॉर्पोरेट कार्यालय : आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई-४०० ०५९, भारत.
शाखा कार्यालय : पहिला मजला, ऑफिस नं. १०१, प्लॉट नं. १५९, मनोहर स्पेस लॅण्डमार्क्स, समर्थ नगर, औरंगाबाद-४३१ ००१.

खासगी करारामार्फत स्थावर मत्तांच्या विक्रीकरिता सूचना

दी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या नियम ९(१) सोबत वाचावयाच्या नियम ८(८) सोबत वाचावयाच्या दी सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत खासगी कराराद्वारे स्थावर मत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना.

आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड (आयसीआयसीआय एचएफसी) यांनी निम्नोल्लेखित गहाण मालमत्तेच्या विक्रीकरिता असंख्य ई-लिलाव संचालित केले, तथापि, असे सर्व ई-लिलाव निष्फळ ठरले. आता एका इच्छुक खरेदीदाराने उक्त मालमत्ता रु. १,८००,०००/ रु. १,४००,००० रकमेला खरेदी करण्याचा प्रस्ताव घेऊन आयसीआयसीआय एचएफसी यांच्याशी संपर्क साधला आहे. सामान्यतः जनतेला आणि विशेषतः कर्जदारांना आणि हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि.च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी ज्यांचा ताबा घेतला आहे अशा प्रतिभूत धनकोकडे गहाण ठेवलेल्या/ भारित असलेल्या निम्नवर्णित स्थावर मालमत्ता येथे खाली दिलेल्या संक्षिप्त तपशिलांनुसार खासगी कराराद्वारे ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' तत्त्वावर विकल्या जाणार आहेत.

अ. क्र.	कर्जदाराचे/ सह-कर्जदाराचे/ हमीदाराचे/ कायदेशीर वारसदाराचे नाव. कर्ज खाते क्रमांक	असल्यास, ज्ञात बोजांसह प्रतिभूत मत्तेचे तपशील	अदत्त रक्कम	राखीव किंमत / इसारा रक्कम ठेव	मालमत्ता पाहणीची तारीख व वेळ	लिलावाची तारीख व वेळ	लिलावाच्या तारखेपूर्वी एक दिवस अगोदर	सरफेसी टप्पा
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(एच)	(आय)	(जे)
१.	उस्मान अलिखान फारुक (कर्जदार), फारुक अलिखान कासिम अलिखान (सह-कर्जदार), तौसिया बेगम उस्मान अलिखान (सह-कर्जदार) एलएचएयूआर००००१३१७११३	सदनिका क्र. टी२, तिसरा मजला स्टिल्ट, दुसरा मजला, अम्मारा एन्क्लेव्ह, पालिका गृह क्र. ४ ८ ७३, सीटीएस नं. ८८१६, औरंगाबाद-४३१ ००१	रु. ७,१०६,३५७/- ९ सप्टेंबर २०२४	रु. १,८००,०००/- रु. १८०,०००/-	२४ सप्टेंबर २०२४ स. ११ ते दु. ३ वाजण्याच्या दरम्यान	०४ ऑक्टोबर २०२४ दु. २ ते दु. ३ वाजण्याच्या दरम्यान	०३ ऑक्टोबर २०२४	वास्तविक ताबा
२.	जावेद अल्लाउद्दिन सईद (कर्जदार), हलिमा बेगम सईद अल्लाऊद्दिन (सह-कर्जदार) एलएचएयूआर००००१२७२१९८	सदनिका क्र. ए८ (२०४), दुसरा मजला, व्हीआयपी को. ऑप. हाऊ. सोसा., सीटीएस नं. ११३८७/१, शीट नं. १४ आणि १९, सर्फराज नगर, फाजलपुरा, औरंगाबाद.	रु. ४,११४,२३५.९४/- ९ सप्टेंबर २०२४	रु. १,४००,०००/- रु. १४०,०००/-	२४ सप्टेंबर २०२४ स. ११ ते दु. ३ वाजण्याच्या दरम्यान	०४ ऑक्टोबर २०२४ दु. २ ते दु. ३ वाजण्याच्या दरम्यान	०३ ऑक्टोबर २०२४	वास्तविक ताबा

आमची लिलाव एजन्सी **श्रीराम ऑटोमॉल इंडिया लि.** यांच्या वेबसाइटवर (यूआरएल लिंक- eauctions.samil.in) ऑनलाइन संचालित केला जाईल. संभाव्य बोलीदाराने **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड** यांच्याकडे जाहिरातीच्या वरच्या भागात नमूद केलेल्या शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर **०३ ऑक्टोबर २०२४** रोजी **दुपारी ४ वाजे**पर्यंत किंवा त्यापूर्वी इसारा रक्कम ठेव (इरठे) आरटीजीएस/ डिमाण्ड ड्राफ्ट (डीडी) (पाहा स्तंभ ई) सादर केला पाहिजे. संभाव्य बोलीदाराने नोंदणी प्रपत्राची स्वाक्षरीकृत प्रत आणि बोलीच्या अटी व शर्तींचे प्रपत्रसुद्धा **०३ ऑक्टोबर २०२४** रोजी **सायं. ५ वाजण्या**पूर्वी किंवा अगोदर जाहिरातीच्या वरच्या भागातील मजकुरात नमूद केलेल्या शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड** यांच्याकडे सादर करावी लागेल. इसारा रक्कम ठेव **औरंगाबाद** येथे देय ''आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि.- ऑक्शन'' या नावावरील राष्ट्रीयीकृत/ शेड्यूल्ड बँकेकडील डिमाण्ड ड्राफ्ट (डीडी) स्वरूपात असावी.

सामान्य जनतेला विनंती करण्यात येते की, उपरोल्लेखित इच्छुक खरेदीदाराने प्रस्तुत केलेल्या रकमेपेक्षा जास्त रकमेची बोली सादर करावी. याद्वारे असे कळविण्यात येते की, पूर्वोल्लेखित इच्छुक खरेदीदाराने प्रस्तुत केलेल्या रकमेपेक्षा जास्त रकमेची एकही बोली न आल्यास दी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या नियम ९(१) सोबत वाचावयाच्या नियम ८(८) नुसार उक्त इच्छुक खरेदीदाराला ही गहाण मालमत्ता विकली जाईल.

पाहणी, विक्रीच्या अटी व शर्ती किंवा बोल्यांचे सादरीकरणसंदर्भातील कोणत्याही अधिक स्पष्टीकरणासाठी ९९२०८०७३०० वर आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेडशी संपर्क साधावा.

कोणतीही अधिक कारणे न देता कोणतीही किंवा सर्व बोल्या नाकारण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे राखून ठेवण्यात आला आहे. विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तींकरिता कृपया https://www.icicihfc.com/ येथे भेट द्या.

दिनांक : १९.०९.२०२४ । स्थळ : औरंगाबाद **प्राधिकृत अधिकारी, आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड । सीआयएन : यू६५९२२एमएच१९९९पीएलसी१२०१०६**

इंडियन बैंक इलाहाबाद Indian Bank ALLAHABAD

सॅम स्मॉल, पुणे शाखा

बिल्डिंग नं. २, प्लॉट नं. एस-२१३, ज्युपिटर हाऊसिंग सोसायटी, कल्याणीनगर, पुणे ४११००६.
Ph.: 020-29950116 | Email: samsmall.pune@indianbank.co.in

प्रति,

१. मेसर्स सिद्धिविनायक बिल्डिंग एलिमेंट्स प्रा. लि.
पत्ता : प्लॉट नं. बी-११/१, नरडाणा एमआयडीसी क्षेत्र, गाव बाभळे, तालुका सिंदखेडा, जि. धुळे
२. श्री. राज राजीव चौदगरी (संचालक/जामीनदार)
पत्ता : प्लॉट नं.१६, महात्मा फुले हाऊसिंग सोसायटी, राधास्वामी कॉलनीजवळ, हर्सूल, औरंगाबाद ४३१००१,
पत्ता : सईदा कॉलनी, जटवाडा रोड, औरंगाबाद ४३१००१
३. श्री अब्दुल अजीज खान बाज खान (संचालक/जामीनदार)
पत्ता : एच नं. ८-४-३४१, ग्लोबल मार्केटच्या मागे, शाहबाजार, औरंगाबाद ४३१००१

विलफुल डिफॉल्टर ठरविण्याकरिता कारणे दाखवा नोटीस

अकाऊंट : मेसर्स सिध्दीविनायक बिल्डिंग एलिमेंट्स प्रा.लि. शाखा : सॅम पुणे (मूळ शाखा : इंड एमएसएमई शाखा, पुणे)

महोदय,

तुमच्या विनंतीनुसार बँकेने खाद्य पदार्थ तयार करण्यासाठी – मका प्रक्रिया आणि व्हिटॅमिनयुक्त हाय प्रोटीन पीठ, डाळ व इतर कडधान्य तळणे यासाठी यांच्या **IND MSME** शाखेद्वारे **रु. ८.९५ कोटी कर्ज** सोल बँकिग अंतर्गत मंजूर केले होते, ज्यामध्ये पहिली कर्जदार कंपनी आहे आणि २रे आणि ३रे संचालक आहेत. ज्यांनी कागदपत्रे/करारांची अंमलबजावणी केली आहे.

कर्जदार कंपनीने कर्ज मंजुरीच्या नियम व अटींनुसार कर्ज परतफेड केली नाही. आमच्या अथक प्रयत्नांनंतरही कर्जदाराने त्यांचे खाते जाणूनबुजून रेग्युलर केले नाही, आणि अखेर सदर खाते रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार ३०.०३.२०२१ रोजी नॉन-परफॉर्मिंग ॲसेट म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे.

बँकेला वरिल खात्याच्या कामकाजामध्ये अनेक त्रूटी आणि कर्ज मंजुरीच्या अटी व नियमांचे पालन न केलेल आढळून आलेले आहे. आणि खाली नमूद केलेल्या कृती ह्या रिझर्व्ह बँकेने विलफुल डिफॉल्टर घोषित करण्यासाठी सांगितलेल्या चार कृतींपैकी आहेत.

युनिट/कंपनीची कृती, जी भारतीय रिझर्व्ह बँकेने विलफुल डिफॉल्टर म्हणून घोषित केलेल्या चार कृतींपैकी आहे/आहेत:

क्लॉज २.१.३(ए) – पैसे देण्याची क्षमता असून पैसे देण्यास इच्छुक नाही :

सदर युनिटने बँकेचे कर्ज परतफेड करण्याची क्षमता असूनही ती पूर्ण केली नाही.

कारण आणि पुरावे : दि.२२.०३.२०१८ रोजी संचालकांची एकत्रित नेट वर्थ रु.९.९५ कोटी होती. तरी संचालकांकडे पैसे देण्याची क्षमता असूनही त्यांनी जाणूनबुजून बँकेची थकबाकी भरली नाही.

क्लॉज २.१.३(सी) – निधीची हेराफेरी

युनिटने त्याच्या देय / परतफेडीची पूर्तता केली नाही आणि निधीची हेराफेरी केली आहे. ज्यामुळे निधीचा वापर विशिष्ट हेतूसाठी केला गेला नाही ज्यासाठी वित्तपुरवठा केला गेला होता किंवा सदर निधी युनिटकडे इतर मालमत्तेच्या रुपातही उपलब्ध नाही.

कारण आणि पुरावे : ३१/०१/२०२१ च्या स्टॉक स्टेटमेंटनुसार स्टॉकचे मूल्य रु. १.७७ कोटी होते. दिनांक ०१/१२/२०२२ च्या युनिट भेटीच्या अहवालानुसार, स्टॉकचे मूल्य नगण्य होते म्हणजे रु. १.०० लाख अंदाजे. (अंदाजानुसार). OCC खात्यातील सदर कालावधीत एकूण जमा शून्य आहे आणि मुदत कर्ज खात्यातील जमा फक्त रु.६९०००.०० आहे. तरी यावरून स्पष्ट होते की कर्जदाराने स्टॉकची विल्हेवाट लावली आहे आणि विक्रीतून मिळालेली रक्कम कर्ज खात्यात जमा केली गेली नाही, म्हणजे निधी हेराफेरीचे प्रकरण.

कर्जदार कंपनी आणि त्यांच्या संचालकांनी केलेल्या विलफुल डिफॉल्टच्या वरील पुराव्याची तपासणी बँकेच्या कार्यकारी संचालकांच्या अध्यक्षतेखालील विलफुल डिफॉल्टर स्क्रीनिंग समितीने केली आहे. सदर कमिटीने विलफुल डिफॉल्ट झाला आहे म्हणून निष्कर्ष काढला आहे.

वरील कारणांमुळे बँकेने रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कर्जदार कंपनी मेसर्स सिद्धिविनायक बिल्डिंग एलिमेंट्स प्रा. लि., तिचे संचालक श्री. राज राजीव चौदगरी आणि श्री. अब्दुल अजीज खान बाज खान यांना विलफुल डिफॉल्टर ठरविण्यासाठी प्रस्तावित केले आहे, याची नोंद घ्यावी.

तुमची इच्छा असल्यास, तुम्ही बँकेला ही सूचना प्रकाशित केल्यापासून १५ दिवसांच्या आत या संदर्भात निवेदन/सबमिशन सादर करू शकता. याशिवाय, तुम्हाला वैयक्तिक सुनावणीची संधी देखील दिली जाऊ शकते. सदर कालावधीत तुमचे निवेदन किंवा वैयक्तिक सुनावणीसाठी विनंती प्राप्त झाली नाही किंवा तुमच्या निवेदनाने/सबमिशनने बँकेचे समाधान झाले नाही, तर बँक सदर कर्जदार कंपनी आणि त्यांचे संचालक यांना विलफुल डिफॉल्टर घोषित करण्याच्या आणि त्यांची नावे RBI, CIBIL आणि इतर क्रेडीट इनफॉर्मेशन कंपन्यांना कळवण्याचा निर्णय घेईल आणि योग्य कायदेशीर कारवाई देखील केली जाईल.

फिल्ड जनरल मॅनेजर
विलफुल डिफॉल्टर स्क्रिनिंग कमिटीच्या वतीने (WDSC)

दिनांक : १४/०९/२०२४

यूनियन बैंक ऑफ इंडिया भारत सरकार का उपक्रम Union Bank of India A Government of India Undertaking

आस्ति वसुली शाखा, पुणे
सुयोग प्लाझा, १ ला मजला, १२७८, जंगली महाराज रोड, पुणे-४११००४
ईमेल : ubin0578789@unionbankofindia.bank, मोबा.: ८१६९१७८७८०

जंगम/स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी महा ई-ऑक्शन

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरीटी इन्टरेस्ट ॲक्ट, २००२, त्यासह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटी इन्टरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ मधील रूल ८(६) अंतर्गत स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ३० दिवसांची ई-ऑक्शन विक्री सूचना

यानुसार सर्वसाधारण जनतेस आणि विशेषत: कर्जदारांस आणि जामीनदारांस सूचना देण्यात येते की, पुढे नमूद करण्यात आलेल्या स्थावर मालमत्ता, ज्या सुरक्षित धनको यांच्याकडे गहाण/ताब्यात आहेत आणि युनियन बँक ऑफ इंडिया (सुरक्षित धनको) यांचे अधिकृत अधिकारी यांनी सदर मालमत्तांचा प्रतिकात्मक/प्रत्यक्ष ताबा घेतला असून, युनियन बँक ऑफ इंडिया यांना खाली नमूद केलेल्या कर्जदार/जामीनदारांकडून येणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी सदर मालमत्तांची ''जसे आहे, जेथे आहे'', ''जे आहे, जसे आहे'' आणि ''तेथे जे आहे'' तत्त्वावर खाली नमूद केलेल्या तारखेला विक्री करण्यात येणार आहे. राखीव किंमत आणि बयाणा रक्कम खाली नमूद करण्यात आली आहे.

अ. क्र.	शाखेचे नाव, कर्जदार/जामीनदारांची नावे आणि ताब्याचा प्रकार	येणे रक्कम	मालमत्तेचा तपशील	राखीव किंमत	बयाणा अनामत रक्कम	बोली वाढविण्याची कमीत कमी रक्कम
१	एआरबी- पुणे (७८७८०) (९९१३३३७१५५) मे. शंभू महादेव शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज् लि. (सीआयआरपी अंतर्गत), (प्रतिकात्मक ताबा)	रु. ८,४२,१३,९६७.०० (रूपये आठ कोटी बेचाळीस लाख तेरा हजार नऊशे सदुसष्ट फक्त) अधिक त्यावरील व्याज आणि आकार	मे. पिंगळे शुगर ॲण्ड ॲग्रो प्रॉडक्ट्स् प्रा.लि. यांची बिगर शेतजमीन, गट नं. ५६ आणि ५७, गांव सैलु, तालुका गावराई, जि. बीड, क्षेत्रफळ ६८७०० चौ.मी. आणि **चतु:सीमा : पूर्वेस** : गट नं. ५४, **दक्षिणेस** : जहांगीर टाकळी सीमा आणि गट नं. ५५, **पश्चिमेस** : गावाची सीमा, **उत्तरेस** : जातेगांवची सीमा आणि गट नं. ५८.	रु. ४,८८,८४,७७५/- (रूपये चार कोटी अठ्ठ्याऐंशी लाख चौऱ्याऐंशी हजार सातशे पंच्याहत्तर फक्त)	राखीव किंमतीच्या १०%	रु. २,००,०००/- (रूपये दोन लाख फक्त)

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्ती, शाखेच्या संपर्काचा तपशील, नोंदणीकरण, लॉग-इन आणि बोलीसंबंधित नियमांसाठी कृपया **https://ebkray.in.** ला भेट द्या.
टीप : सर्व प्रस्तावकांना सल्ला देण्यात येतो की, शेवटच्या क्षणाची गुंतागुंत टाळण्याकरीता त्यांनी कृपया ई-ऑक्शनच्या तारखेच्या अलिकडे ३-४ दिवस वरील साईटला भेट देऊन तसेच रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण करून, केवायसी अद्ययावत करून रक्कम जमा करावी.

- ई-ऑक्शनची तारीख व वेळ : दि. २९/१०/२०२४, (दु. १२.०० ते सायं. ५.०० दरम्यान.)

दिनांक : १७/०९/२०२४
स्थळ : पुणे

सदर नोटीस ही प्रादेशिक भाषेमध्येसुध्दा प्रसिध्द करण्यात येते.
कोणत्याही स्पष्टीकरणासाठी मूळ इंग्रजी नोटीस ग्राह्य धरण्यात येईल.

अधिकृत अधिकारी,
युनियन बँक ऑफ इंडिया

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India

क्षेत्रीय कार्यालय, अमरावती

क्षेत्रीय कार्यालय, पहिला मजला, आयुर मॉल, विदर्भ आयुर्वेदिक कॉलेज, दस्तूर नगर, फारशी स्टॉप रोड, अमरावती-444606

कृपया मालमत्तेच्या तपशीलासाठी QR कोड स्कॅन करा

अचल संपत्ती विक्री करिता विक्री सुचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 च्या नियम 8 (6) च्या तरतुदी अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरीता ई-लिलाव विक्री सूचना.

विशेषत: कर्जदार आणि जमानतदार आणि सर्वसामान्य जनतेला याव्दारे सूचीत करण्यात येते की, खाली वर्णन करण्यात आलेली स्थावर असलेली सुरक्षित मालमत्ता युनियन बँक ऑफ इंडियाकडे गहाण / चार्ज असून युनियन बँक ऑफ इंडिया चे प्राधिकृत अधिकारी यांच्याव्दारे **वास्तविक ताबा** घेतला आहे ज्याचे विवरण खालील प्रमाणे **"जे आहे जेथे आहे, जे आहे जसे आहे"** आणि **"जे आहे तिथे आहे"** या आधारावर खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि जमानतदारांकडून नमूद केल्याप्रमाणे थकबाकी वसुलीसाठी विक्री केली जाईल. राखीव किंमत आणि बयाणा रक्कम खालीलप्रमाणे आहे:

शाखा : बसमत रोड, परभणी
एस पी ऑफिस जवळ, बसमत रोड, परभणी - 431401.. श्री इलियास अन्सारी (बी.एम.) मोबाईल क्रमांक 7761843260

1.	कर्जदार आणि जमानतदाराचे नाव : मेसर्स मोंटाना फुड्स (कर्जदार) त्यांचा द्वारा प्रोप्रा. श्री विजय हरिभाऊ हरकळ, 2.श्री. विवेक विजयराव हरकळ (जमानतदार) 3.श्री. श्रीधर दिगंबरराव कोक्कर (जमानतदार), 4.श्री. अक्षय विजय हरकळ (जमानतदार)	देय रक्कम रु. 2,83,64,598.35 (दिनांक 20.06.2017 च्या मागणी सुचनानुसार) आणि त्यावरील पुढील व्याज आणि खर्च
1.1	**मालमत्ता नं. 1** सर्व भाग आणि तुकडा असलेले दुकान सह निवासी बिल्डींग स्थित जी.पी. नं. 1227, एकुण क्षेत्रफळ एरीया 1144 चौ.फुट, (103.31 चौ.मी.), मौजा पेडगाव, तालुका आणि जिल्हा परभणी. **चर्तुसिमा : उत्तरेस** - श्री. शिवाजी यांचे प्लॉट, **दक्षिणेस** - श्री. जंजाळे यांचे प्लॉट, **पुर्वेस** - रोड, **पश्चिमेस** - श्री. बाळासाहेब यांचे प्लॉट **राखीव किंमत: रु. 27,00,000.00, ई.एम.डी. रु. 2,70,000.00**	
1.2	**मालमत्ता नं. 2** सर्व भाग आणि तुकडा असलेले औद्यागिक युनिट स्थित गट नं. 478, एकुण क्षेत्रफळ एरीया 3526 चौ.मी. मौजा पेडगाव, तालुका आणि जिल्हा परभणी. **चर्तुसिमा विक्री करारानुसार : उत्तरेस** - श्री. कैलास यांचे प्लॉट (गट नं. 478 (पी)), **दक्षिणेस** - श्री. बालु वामनराव देशमुख यांचे प्लॉट, **पुर्वेस** - श्री. सत्यवान आणि कैलास यांचे प्लॉट, **पश्चिमेस** - श्री. पांडुरंग यांचे प्लॉट. **वास्तविक उत्तरेस** - गट नं. 471, **दक्षिणेस** - गट नं. 478 (पी), **पुर्वेस** - गट नं. 478 (पी), **पश्चिमेस** - रोड आणि उर्दू शाळा **राखीव किंमत: रु. 75,16,000.00, ई.एम.डी. रु. 7,51,600.00**	
1.3	**मालमत्ता नं. 3** सर्व भाग आणि तुकडा असलेले मोकळा प्लॉट स्थित जी.पी. नं. 2146 एकुण क्षेत्रफळ एरीया 743.14 चौ.मी. मौजा पेडगाव, तालुका आणि जिल्हा परभणी. **चर्तुसिमा : उत्तरेस** - श्री. विवेक हरकळ यांचे प्लॉट (घर नं. 2145), **दक्षिणेस** - श्री. विजय हरकळ यांचे प्लॉट, **पुर्वेस** - रोड, **पश्चिमेस** - श्री. प्रभाकर हरकळ यांचे प्लॉट. **राखीव किंमत: रु. 12,64,000.00, ई.एम.डी. रु. 1,26,400.00**	
1.4	**मालमत्ता नं. 4** सर्व भाग आणि तुकडा असलेले मोकळा प्लॉट स्थित जी.पी. नं. 2146 एकुण क्षेत्रफळ एरीया 743.14 मौजा पेडगाव, तालुका आणि जिल्हा परभणी. **चर्तुसिमा : उत्तरेस** - श्री. विवेक हरकळ यांचे प्लॉट (घर नं. 2145), **दक्षिणेस** - श्री. विजय हरकळ यांचे प्लॉट, **पुर्वेस** - रोड, **पश्चिमेस** - श्री. प्रभाकर हरकळ यांचे प्लॉट. **राखीव किंमत: रु. 12,64,000.00, ई.एम.डी. रु. 1,26,400.00**	

ई-लिलावाची दिनांक आणि वेळ : 09/10/2024 (दुपारी 12 ते सायं. 5 वा. पर्यंत) | **लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्यापूर्वी ईएमडी जमा केली जाईल.**

विक्री आणि नोंदणी आणि लॉगिन आणि बिडिंग नियमांच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी भेट द्या.
https://ebkray.in

टिप: शेवटच्या क्षणाची गर्दी टाळण्यासाठी सर्व बोलीदारांना विनंती करण्यात येते की वरील वेबसाइटला भेट द्यावे व ई-लिलावाच्या तारखेपूर्वी किमान 2 ते 3 दिवसापुर्वी नोंदणी, केवायसी अपडेशन व पेमेंट पूर्ण करावे. भारांचे तपशील, सुरक्षित कर्जदारांना माहित असल्यास; "शाखेला माहित नाही बोली वाढीची रक्कम : राखीव किंमतीच्या 1%

दिनांक: 19/09/2024
ठिकाण : परभणी

(इंग्रजीतील मूळ मजकूर ग्राह्य धरण्यात येईल.)

अधिकृत अधिकारी
युनियन बँक ऑफ इंडिया

लोकसत्ता Classifieds FROM ANYTHING TO EVERYTHING.

पाहिजेत

प्रगति प्रतिष्ठान संचलित, निलेश ल. मुर्डेश्वर कर्णबधिर विद्यालय जव्हार
पत्ता- 'तेंडुलकर स्मृती',भारत पेट्रोल पंप समोर, जव्हार
ता. जव्हार जि. पालघर, ४०१६०३
Email - pragatipratishan7@gmail.com
Phone No. 95615 97250

आमच्या प्रगति प्रतिष्ठान संचलित, निलेश ल. मुर्डेश्वर कर्णबधिर विद्यालय जव्हार ता. जव्हार जि. पालघर या संस्थेच्या शाळेत शासनाकडून प्राप्त नाहरकत प्रमाणपत्र क्र.PLGHIG०४०२४९००००००१६१ नुसार, शाळेतील खालिलप्रमाणे रिक्त पदे भरावयाची आहेत. तरी इच्छुक व पात्र शैक्षणिक अर्हताधारक उमेदवारांनी **शनिवार दि. २८/०९/२०२४ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत** वरील पत्त्यावर आपले अर्ज, मूळ शैक्षणिक प्रमाणपत्र व जात प्रमाणपत्र व त्याच्या साक्षांकित प्रतिसह मुलाखतीस उपस्थित राहावे.

अ.क्र	पद	रिक्त पदसंख्या	जाती प्रवर्ग	शैक्षणिक पात्रता
१	विशेष शिक्षक	२	अनु.जमाती (S.T.)- १ पद आर्थिक दुर्बल घटक (E.W.S.)- १ पद	माध्यमिक शालांत अथवा उच्च माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र धारक संबंधित (H.I.) प्रवर्गातील डिप्लोमा इन स्पेशल एज्युकेशन व आर.सी.आय. नोंदणी प्रमाणपत्र धारक

वरील पदांसाठी वयोमर्यादा शासन नियमानुसार खुला प्रवर्गासाठी कमाल ३८ वर्षे राहील व मागासवर्गीय उमेदवारांकरिता कमाल ४३ वर्षे राहील. सदर पदांसाठी शासननियमानुसार वेतनश्रेणी मिळेल.

अध्यक्ष / सचिव
प्रगति प्रतिष्ठान जव्हार ता. जव्हार जि. पालघर

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्यातील आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेड जबाबदार ठरवता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

यात्रासहल

☞ **श्रीरामकृष्ण- कुरवपुर- पिठापुर- परीकोणार्कसह- १४-१०-२०२४// १६-१२-२०२४// मध्यप्रदेश- २३-११-२०२४// सिक्कीम- दार्जिलिंग- लाचुंगसह- १२-१२-२०२४// शास्त्रोक्त- नर्मदापरिक्रमा- ०५-११-२०२४// २१-११-२०२४// १६-१२-२०२४// गिरनार- परिक्रमा- सौराष्ट्रदर्शनसह- ०६-११-२०२४// कर्नाटकदर्शन- कुर्गसह- १५-११-२०२४// कुरुक्षेत्र- महाभारतकथा- कथाकार- अजेयबुवा- सज्जनगड- ०१-०१-२०२५// राजस्थान- १५-०१-२०२५// नैमिष्यारण्य- त्रिस्थळीयात्रा- अयोध्यासह- २५-११-२०२४// चारधामयात्रा- १४-१०-२०२४// बापट- 9137001395/ 9820071471**

0070897793-13

नोकरीविषयक

ENGINEERING

Wanted Young Engineer Diploma / ITI For Electronic Instruments Factory with 2 Yrs. Exp. Apply to: jobs@goliyainstruments.com <mailto:jobs@goliyainstruments.com>

0130045069-2

WORK FROM HOME

घरातून काम करा, आरोग्य सेवा करून इन्कम मिळवा. शिका व कमवा, स्वतःचे आयुष्य बदलण्याची संधी. उत्तम सर 8669060263

0130045221-1